# मेट्रो-३ वर ५ किलोमीटर मार्गिकेचे काम पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा- वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेचे ५ हजार १०० मीटरचे काम पूर्ण झाले असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (एमएमआरसी) स्पष्ट करण्यात आले आहे. १५ टनेल बोरिंग मशिन्स (टीबीएम) मुंबईमध्ये दाखल झाल्या असून आठ मशिन्स पुर्ण क्षमतेने कार्यन्वित झाल्या असल्याचे एमएमआरसीने स्पष्ट केले आहे.

शहरातील पहिल्या संपूर्ण भुयारी मेट्रो शाफ्टद्वारे टनेल बोरिंग मशिन्स भूगर्भात सोडून भुयारीकरणाचे काम सुरू करण्यात येत असून विविध ठिकाणच्या टीबीएम लाँचिंग शाफ्टद्वारे टीबीएम भूगर्भामध्ये सोडून भुयारीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. मेट्रो-३ प्रकल्पासाठी एकू ण १७ टीबीएमची आवश्यकता आहे. त्या सर्वांची कारखाना स्वीकृती चाचणी यशस्वीपणे पूर्ण झाली आहे. त्यापैकी १५ मशीन्स मुंबईत दाखल झाली.